# नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील इंग्रजी अध्यापकाचे व्यावसायिक कौशल्य - एक अभ्यास

**डॉ. के.एच. कुलकर्णी**
इंदिरा अध्यापक महाविद्यालय (एम.एड्.)
विष्णुपुरी नांदेड

**प्रस्तावना :-**

अध्यापकास अध्यापन करताना विविध प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते. या समस्या सोडविण्यासाठी तसेच विषयाचे उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी विविध प्रकारच्या संकल्पना स्पष्ट करत असतांना विविध प्रकारच्या व्यावसायिक कौशल्यांचा आढावा पुढील प्रमाणे घेतला आहे.

**समस्या विधान :-**

"नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील इंग्रजी अध्यापकाचे व्यावसायिक कौशल्य- एक अभ्यास"

**संशोधनाची गरज :-**

इंग्रजी अध्यापकाचे बदलते कार्य व विद्यार्थ्यांची मानसिकता आणि बदलते जग यांच्याशी ताळमेळ घालण्यासाठी इंग्रजी अध्यापकाचे व्यावसायिक कौशल्य जाणून घेण्यासाठी या संशोधनाची गरज आहे.

**संशोधनाचे महत्त्व :-**

प्रस्तुत संशोधन हे इंग्रजी अध्यापक यांचे बदलते व्यावसायिक कौशल्य यांचा अभ्यास करण्यासाठी महत्त्वाचे आहे.

**कार्यात्मक व्याख्या :-**

१) **नांदेड :-** महाराष्ट्रातील एक प्रशासकीय जिल्हा.
२) **माध्यमिक :-** शिक्षण क्षेत्रातील ९ ते १० हे वर्ग अंतर्भूत असणारा स्तर.
३) **अध्यापक :-** नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावर इंग्रजी विषयाचे अध्यापन करणारा व्यावसायिक कौशल्य.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावर इंग्रजी विषयाचे अध्यापन करणारा अध्यापकाची अध्यापन कौशल्य अभ्यासणे.
२) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावर इंग्रजी विषयाचे अध्यापन करणारा अध्यापकाची संभाषण कौशल्य अभ्यासणे.
३) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावर इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या अध्यापकाचे व्यवस्थापन कौशल्य अभ्यासणे.
४) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावर इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या अध्यापकाचे तांत्रिक कौशल्य अभ्यासणे.
५) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावर इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या अध्यापकाचे वैचारिक कौशल्य अभ्यासणे.

**परिकल्पना :-**

१) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावर इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या अध्यापकाचे अध्यापन कौशल्य आहे.
२) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावर इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या अध्यापकाचे संभाषण कौशल्य आहे.
३) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावर इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या अध्यापकाचे व्यवस्थापन कौशल्य आहे.
४) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावर इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या अध्यापकाचे तांत्रिक कौशल्य आहे.
५) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावर इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या अध्यापकाचे वैचारिक कौशल्य आहे.

**संशोधनाची पध्दती :-** प्रस्तुत संशोधनासाठी सर्वाण संशोधन पध्दतीचा वापर केला आहे.

**संशोधनाची साधने :-** प्रस्तुत संशोधनासाठी प्रश्नावली या साधनाचा वापर केला आहे. तसेच इतर माहिती मिळविण्यासाठी प्राथमिक व द्वितीय साधनांचा वापर केला आहे.

**संशोधन जनसंख्या :-** प्रस्तुत संशोधनासाठी माध्यमिक स्तरावर इंग्रजी विषयाचे अध्यापन करणारे नांदेड जिल्ह्यातील ९० अध्यापक निवडले आहेत.

**न्यादर्श :-** प्रस्तुत संशोधनासाठी न्यादर्श म्हणून नमुना निवड पध्दती मधील सहेतुक नमुना निवड पध्दतीचा वापर करून ५० अध्यापक निवडले आहेत.

**संशोधनाची कार्यपध्दती :-**

प्रस्तुत संशोधन करत असतांना इंग्रजी अध्यापकास प्रश्नावली पूरविली गेली. तसेच अध्यापकांना वरिष्ठांनी दिलेले रेकॉर्डबुकवरील रिमार्क विचारात घेतले आहे. प्रस्तुत

संशोधनासाठी संशोधकाने अध्यापकाच्या अध्यापनाचे निरीक्षण केले.

**निष्कर्ष :-**

१) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावर इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या अध्यापकाचे अध्यापन कौशल्य उत्तम आहे.

२) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावर इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या अध्यापकाचे मौखिक संभाषण कौशल्य हे लिखीत संभाषण कौशल्यापेक्षा जास्त प्रभावी आढळून आले.

३) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावर इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या अध्यापकाचे व्यवस्थापन कौशल्य हे वयानुसार बदलणारे दिसून आले.

४) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावर इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या अध्यापकाचा तांत्रिक साधनाचा वापर हा वयानुसार बदलणारा दिसून आला आहे.

५) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावर इंग्रजी विषयाचे अध्यापन करणारा अध्यापक हा वैचारीक कौशल्याने परिपूर्ण आहे.

**शिफारशी :-**

१) इंग्रजी अध्यापन पध्दती - वापर यावर चर्चा सत्रे आयोजित करण्यात यावेत.

२) इंग्रजी भाषेविषयीची असणारी भीती कमी करण्यासाठी शिक्षकांचे समुपदेशन करावे.

३) तांत्रिक कौशल्य - वापर वाढविण्यासाठी शिबीरे आयोजित करण्यात यावीत.

४) वर्ग व्यवस्थापन यासाठी शिक्षकांना वरिष्ठांनी मार्गदर्शन करावे.

**संदर्भ साहित्य :-**

१) मुळे रा.श.वि.तू.-१९८७ शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे, नागपुर साहित्य प्रसार केंद.

२) इंग्रजी अध्यापन पध्दती बी.एड्.व डी.टी.एड्. - फडके प्रकाशन कोल्हापुर.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com